Rayat Shikshan Sanstha's

Shri Sadguru Gangageer Maharaj Science, Gautam Arts and Sanjivani Commerce College, Kopargaon, Dist:

Academic Year 2017-18

Conession in Fees as per Resplution No. 5 of the Meeting dated on 10/07/2017

Non-Grant Admission List B. Sc.

| Sr.No | Class | Total No. of the Students | Fees Category | Total Fees | Consession | Fees after Consession |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | T. Y. B. Sc. | 0 | RCSMS | 0 | 0 | 0 |
| | Total | 14 | | 224000 | 126000 | 98000 |

Principal
S.S.G.M.College
Kopargaon

Rayat Shikshan Sanstha's

Shri Sadguru Gangageer Maharaj Science, Gautam Arts and Sanjivani Commerce College, Kopargaon, Dist: Ahmednagar

Academic Year 2017-18

Non-Grant Admission List

T.Y.B. Sc.- Physics

| Sr.No | Re.No | PaidFee | Refunded Fee | Total Fees | Consession | Fees After Consession | Adm. Date |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 209 | Bhosale Supriya Ramrao | PAYING | 16000 | 9000 | 7000 | 13/07/2017 |
| 2 | 234 | Bhusare Pallavi Bharat | PAYING | 16000 | 9000 | 7000 | 14/07/2017 |
| 3 | 46 | Dawange Gayatri Nanasaheb | R.C.S.M.S | 16000 | 9000 | 7000 | 11/07/2017 |
| 4 | 107 | Deokar Sharda Balasaheb | PAYING | 16000 | 9000 | 7000 | 11/07/2017 |
| 5 | 84 | Gade Pallavi Rajendra | R.C.S.M.S | 16000 | 9000 | 7000 | 12/07/2017 |
| 6 | 8 | Gaikwad Dhanshri Chandrakant | R.C.S.M.S | 16000 | 9000 | 7000 | 11/07/2017 |
| 7 | 118 | Gaikwad Pragati Raju | PAYING | 16000 | 9000 | 7000 | 12/07/2017 |
| 8 | 237 | Gawali Snehal Sahebrao | PAYING | 16000 | 9000 | 7000 | 14/07/2017 |
| 9 | 221 | Gunjal Rohit Laxman | PAYING | 16000 | 9000 | 7000 | 13/07/2017 |
| 10 | 120 | Jadhav Bhavika Kailash | PAYING | 16000 | 9000 | 7000 | 12/07/2017 |
| 11 | 195 | Londhe Rushikesh Kakasaheb | PAYING | 16000 | 9000 | 7000 | 13/07/2017 |
| 12 | 229 | Patole Ashwini Ganesh | PAYING | 16000 | 9000 | 7000 | 13/07/2017 |
| 13 | 246 | Sor Shraddha Baban | PAYING | 16000 | 9000 | 7000 | 16/07/2017 |
| 14 | 197 | Ugale Mayuri Vijay | PAYING | 16000 | 9000 | 7000 | 13/07/2017 |
| | | **Total 14** | | **224000** | **126000** | **98000** | |

Principal
S.S.G.M.College
Kop...

रयत शिक्षण संस्थेचे,
श्री सद्गुरु गंगागिर महाराज सायन्स, गौतम आर्टस व संजीवनी कॉमर्स कॉलेज, कोपरगाव,
जि. अहमदनगर

## स्थानिक व्यवस्थापन समिती

(दि. १०/०७/२०१७ रोजी झालेल्या पहिल्या सभेचे इतिवृत्त)

स्थानिक व्यवस्थापन समितीचे सन्माननीय चेअरमन व संस्थेचे सन्माननीय उपाध्यक्ष मा. मा. श्री. शंकररावजी कोल्हे साहेब यांनी सभेचे अध्यक्षस्थान भूषविले त्याबद्दल सभेचे प्राचार्य डॉ. काकडे के. पी. यांनी त्यांचे मन:पूर्वक स्वागत केले व आलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करून सभेचे कामकाज सुरू केले.

**विषय क्र.१ : मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.**

ठराव क्र.१ : शैक्षणिक वर्ष २०१६–१७ मधील चौथ्या सभेचे इतिवृत्त अधीक्षक श्री.गोसावी एस. एस. यांनी सभेपुढे वाचून दाखविले. सभेने त्यास मंजुरी दिली.

ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.२. ज्युनिअर, सिनिअर विभागाच्या निकालाबाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र.२** : ज्युनिअर विभागाचे उपप्राचार्य देवकर एन.आर. यांनी इ.१२ वी बोर्डाचा कला,विज्ञान व वाणिज्य या विषयांचा निकाल सभेपुढे वाचून दाखविला. निकाल उत्तम प्रकारचा लागल्याने सभेने समाधान व्यक्त केले. मागील वर्षी वाणिज्य विषयाचा निकाल हा ५२% होता. मा. कोल्हेसाहेबांनी **गुणवत्ता सुधार योजना** हा उपक्रम राबवून गुणवत्ता वाढविण्याच्यादृष्टीने मार्गदर्शन केले त्यांच्या मार्गदर्शनामुळेच वाणिज्य विभागाचा निकाल हा **५२% वरून आज ९०.९६%** पर्यंत लागला आहे. यामध्ये मा. कोल्हेसाहेबांचा सिंहाचा वाटा असल्याने, उपप्राचार्य देवकर एन. आर व सभेने त्यांचे अभिनंदन केले

एम.सी.व्ही.सी. विभागाचा बोर्डाचा निकाल ९८% व कॉलेजचा निकाल ८०% असा लागलेला आहे. कॉलेजचा निकाल बोर्डाच्या निकालापेक्षा कमी लागल्याने सभेने असमाधान व्यक्त केले आहे. याबाबत संबधित शिक्षकांना लेखी विचारणा करावी व विषयवार तुलनात्मक निकाल पुढील मिटींगचेवेळी सभेपुढे ठेवण्यात यावेत अशी सूचना करण्यात आली.

सिनिअर विज्ञान विभागाचे उपप्राचार्य प्रा.शेटे एस.टी. यांनी विज्ञान विभागाचा निकाल सभेपुढे वाचून दाखविला. गणित विषयाचा निकाल चांगला लागल्याने व १६ विद्यार्थी First Class with Dist. मध्ये आल्याने, गणित विषयाच्या प्राध्यापिका कु. लबडे एम.बी. यांचे सभेने कौतूक करून अभिनंदन केले आहे. बॉटनी व केमिस्ट्री या विषयांचा निकाल कमी लागल्याने सभेने असमाधान व्यक्त केले आहे. संबधित विभागाचे विभागप्रमुख व विषयाचे शिक्षक यांना सभेपुढे

... ही विषयाचा पेपरसेटर आहेत. डॉ.नालकर एन.डी. यांना त्यांच्या बॉटनी विषयाचा पेपर पाहता सोपा गेला असल्याचे सांगितले आहे. मुलांनी हा पेपर विद्यापीठाकडे व्हेरिफिकेशनसाठी पाठविला असल्याचे सांगितले आहे. ऑरगॅनिक केमिस्ट्री विषयात १५ मुले नापास झालेले आहेत. याबाबत प्रा.डॉ. निकुंभ ए.बी. यांनी कॉपी चेकींग मध्ये मुले नापास होतात असे स्पष्टीकरण सभेपुढे दिले आहे.

प्रा.देवकर एस.एस. यांनी कला विभागाचा निकाल वाचून दाखविला. प्रा.डॉ.निघोट बी.बी. यांनी बी.बी.ए. चा निकाल वाचून दाखविला. निकाल चांगले लागल्याने सभेचे समाधान व्यक्त झाले.

ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.३. वॉलकंपाऊंड दुरूस्तीस परवानगी घेणे.**

ठराव क्र. ३ : महाविद्यालयाचे वॉलकंपाऊंड दुरूस्त करणे आवश्यक आहे. यासाठी एकूण खर्च रू. ८८,०००/- लागणार आहे. याचे इस्टीमेट काढलेले असल्याने सभा इस्टीमेटप्रमाणे वॉलकंपाऊंड दुरूस्त करण्यास परवानगी देत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.४.– मा.अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळच्या विषयावर चर्चा करणे.**

ठराव क्र.१– सदरील सभेत कै.कुलकर्णी अनंतराव लक्ष्मणराव यांचे रिक्त जागेवर **श्री. बाळासाहेब म्हाळूशेट आव्हाड** यांची स्थानिक व्यवस्थापन समितीच्या **सन्माननीय सदस्यपदी** नियुक्ती करण्यास सभेने मंजुरी दिली आहे. श्री. बाळासाहेब म्हाळूशेट आव्हाड यांना येथूनपुढे सदर मिटींगसाठी हजर राहणेबाबत पत्र देण्यात यावे असे ठरले.

**ठराव क्र. २ अ) नॅकसाठी खालील कामे तातडीने करून घेतलेली आहेत.**

१. सिमेंट गार्डन बेंचससाठी १,१९,०००/– खर्चास परवानगी.
महाविद्यालय परिसरात विद्यार्थ्यांच्या बसण्याच्या सोईसाठी गार्डन बेंचस बसविणे गरजेचे असल्याने, नॅक साठी बेंचस बसविण्यात आले आहेत. ( नग–३५, रू. ३४००/–प्रमाणे ) यास सभा परवानगी देत आहे.

२. पडदे – महाविद्यालयातील सर्व विभागात पडदे बसविले आहेत व फिजिक्स,झुलॉजी,बॉटनी, क्रीडा विभाग, एन.सी.सी., एन.एस.एस. इ. ठिकाणी कारपेट बसविले आहेत. या कामासाठी रू. ४,८८,७२०/– इतका खर्च आलेला आहे. सदर खर्चास सभा परवानगी देत आहे.

Principal
S.S.G.M.College
Kopargaon

३ खालील खात्यास खालीलप्रमाणे मंजूर बजेटपेक्षा जादा खर्च झालेला आहे.

| खाते | मान्य रक्कम | प्रत्यक्ष खर्च | जादा खर्च |
|---|---|---|---|
| १) लॅब खर्च शास्त्रीय साहित्य | ७०००० | ३८२३३६ | ३१२५२६ |
| २) जिमखाना स्टुडंट ॲक्टीव्हिटी. | ५२१२४० | ६४६८२६ | १,२५,५८६ |
| ३) टेलिफोन चार्जेस | १०००० | १७२३१ | ७,२३१ |

सन २०१६–१७ या शैक्षणिक वर्षात महाविद्यालय नॅक कमिटीस सामोरे गेलेले आहे. सदर नॅक कमिटीने दि. ५,६,७ जाने. २०१७ रोजी महाविद्यालयास भेट दिलेली आहे. सदर नॅकसाठी जिमखाना विभाग, लॅब.विभागास आवश्यक साहित्य खरेदी केल्याने, जादा खर्च झालेला आहे.

सदरच्या खर्चास तुर्तास सभा मंजूरी देत नाही. अधीक्षक श्री. गोसावी एस.एस. यांनी मागील नॅक मधील वरील खात्याचे आकडे काढून पुढील मिटींगवेळी ठेवावेत अशी सूचना सभा देत आहे.

४. पी.जी.विभाग –

| खाते | मान्य रक्कम | प्रत्यक्ष खर्च | जादा खर्च |
|---|---|---|---|
| १) फर्निचर | ४,००,००० | ७,७३,०८५ | ३,७३,०८५ |
| २) पी.व्ही.सी.साईन बोर्ड | —— | ४,१६,१४० | ४,१६,१४० |
| ३) सलग्नीकरण फी | १,५०,००० | ४,३३,[illegible] | [illegible] |
| ४) नॅक खर्च | —— | ७,११,६९४ | ७,११,६९४ |

नॅकसाठी –

१) फर्निचर खाते उत्तर विभाग, रौ.ला.उत्पादन केंद्र यांचेकडून १०० बेंचेस खरेदी केल्याने. मंजूर बजेटपेक्षा जादा खर्च झालेला आहे. यास सभा मंजूरी देत आहे.

२) पी.व्ही.सी.साईन बोर्ड बसविणे गरजेचे असल्याने काम करून घेतले आहे त्यास सभा मंजूरी देत आहे.

३) तसेच सलग्नीकरण फी सन २०१६–१७, २०१७–१८ व २०१८–१९ या वर्षातील आहे. यास सभा मंजूरी देत आहे.

४) नॅक खर्च रू. ७,११,६९४ इतका झालेला आहे. सदर खर्चाचा तपशिल पुढील मिटींगचेवेळी सभेपुढे सादर करावा असे ठरले.

५. महाविद्यालयातील नवीन कॅन्टींग करीता ॲल्युमिनियम स्लाईडींग विंडो व किरकोळ इले.फिटींग, ग्रीन नेट बसविणे आवश्यक आहे.( खिडकीचे माप ८फुट X ५ फुट X ६ नग व इतर इले.फिटींग, ग्रीन नेट)

त्यासाठी आर्किटेक्ट कडून खर्च रू. ७५०००/–चे इस्टीमेट घेऊन खर्च करण्यास सभा मंजूरी देत आहे.

६. महाविद्यालयातील वार्षिक दुरूस्तीसाठी प्लंबींग काम,गवंडीकाम, इले.काम व सुतार काम मजुरी व मटेरिअल्स्चे कोटेशन घेण्यास सभा परवानगी देत आहे.

Principal
S.S.G.M.College
Kopargaon

५. फिजिक्स विषयाची विद्यापीठाची फी रू. १६०००/— इतकी आहे. विद्यार्थ्यांनी आर्थिक परिस्थिती नसल्याने,ते भरू शकत नाही. कॉलेजने रू. १६०००/— ऐवजी रू. ७०००/—आकारावी असे प्रा. शेटे एस.टी.यांनी कमिटीपुढे सांगितले. कमिटीने सदर परिस्थितीचा विचार करून त्यास संमती दर्शविली.

ठराव सर्वानुमते मंजूर

६. उपप्राचार्य देवकर एन.आर. यांनी ज्युनिअर व सिनिअर सी.एच.बी. शिक्षकांच्या मानधनात वाढ करावी म्हणून सभेला विनंती केली. सभेने अधीक्षक श्री. गोसावी एस.एस. यांना जमा होणारी रक्कम व मानधनावर खर्च होणारी रक्कम याबाबत विचारणा केली असता, श्री. गोसावी एस.एस यांनी सी.एच.बी. शिक्षकांच्या मानधनावर वर्षाला रू. ६० लाख खर्च होतात व उत्पन्न फक्त ८० लाख आहे असे सभेला सांगितले. त्यामुळे सभेने ही बाब गांर्भीयाने घेऊन तुतार्स मानधन देण्यास संमती दर्शविली नाही. मात्र या कमिटीतील काही सदस्यांची **एक स्वतंत्र कमिटी नेमून** प्रा.देवकर एस.एस यांनी उत्पन्नाचे व मानधनावर होणा—या खर्चाचे आकडे काढून पुढील मिटींगवेळी सभेपुढे सादर करण्याच्या सभेने सूचना दिल्या.

ठराव सर्वानुमते मंजूर

शेवटी सर्व मान्यवरांचे आभार प्रा.सुनिल देवकर यांनी मानले व सभेचे कामकाज संपले.

प्र.प्राचार्य, सचिव

चेअरमन

स्थानिक व्यवस्थापन समिती,
श्री सद्गुरू गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्टस् अँण्ड संजीवनी कॉमर्स कॉलेज,
कोपरगांव,जि. अहमदनगर

Principal
S.S.G.M.College
Kopargaon